# प्रभुभोजन

### प्रभूच्या मेजापाशी विश्वासणाऱ्यांना प्रभूच्या समक्षतेचा अनुभव येतो

मुलांना शिकवणाऱ्यांनी L3b हाअभ्यास वाचावा.

**गट उपासनेची योजना व पुढारीपण करणाऱ्यांसाठीची मार्गदर्शकतत्वे ( परिचय अभ्यास aoe ) अद्याप तुम्ही वाचली नसतील तर आता कृपा करून वाचा.**

**प्रार्थना:** ''प्रिय प्रभू येशू, माझी मंडळी आणि मी तुझी आठवाण म्हणून एकत्रितपणे प्याला व भाकरी सेवन करतांना आम्हाला तुझ्या क्षमा करणाऱ्या कृपेचा व जीवनदायी आत्म्याचा अनुभव येऊ दे.''


1. **तुमच्या मंडळीचे प्रभुभोजनासाठी पुढारीपण करता यावे यासाठी देवाच्या वचनातून आपल्या अंत:करणाची व मनाची तयारी करा.**

गेली वीस शतके प्रभुचे मेज,यालाच प्रभुभोजन, पवित्रसहभागिता आणि सहभागिता असेही म्हणतात, हाच ख्रिस्ती उपासनेचा केंद्रबिंदू आहे.



**पार्श्वभूमी**

- प्याला आणि भाकरी ह्या गोष्टी प्रत्यक्षात ख्रिस्ताचे भौतिक शरीर आणि रक्त अशा होतात असे सांगून काही मंडळयांनी चूक केली आहे.



- काही मंडळयांनी, प्याला व भाकरी ही फक्त आठवण आहे आणि त्यातून आपल्यासाठी काहीही साध्य होत नाही असे सांगून चूक केली आहे.
- तुम्ही पुढे दिलेले पवित्र शास्त्रातील शास्त्रपाठ वाचताना देवाचे वचन प्रभुभोजनाविषयी काय सांगते ते पाहा.

**पाहा निर्गम 12:21-28 मध्ये...**

- इजिप्तमधील कोणत्या लोकांना ''वल्हांडणाच्या'' यज्ञाची तयारी करण्याची आज्ञा केली होती.
- अर्पणाच्या रक्ताचे त्यांनी काय केले.
- ज्यांनी वल्हांडणाचे अर्पण केले होते त्यांना प्रभू काय करणार होता.

**पाहा निर्गम 16:2-5 मध्ये...**

- मोशेच्या मागे मोठया प्रवासाला निघताना इस्राएल लोकांना कशाची चिंता वाटत होती.
- लोकांच्या गरजा भागविण्यासाठी देवाने कशाची तरतूद केली.
- पाहा निर्गम 16:30-31 मध्ये देवाने विनामूल्य दिलेल्या भाकरीला लोक काय म्हणत असत.

**पाहा मार्क 8:1-9 मध्ये...**

- येशूचे शिक्षण ऐकणाऱ्या लोकांविषयी त्याला काय वाटले.
- लोक येशूचे बालणे कोणत्या ठिकाणी बसून ऐकत होते (पाहा वचन 4)
- लोकांच्या गरजा पुरवण्यासाठी येशूने कोणती तरतूद केली.

**पाहा योहान 6:25-36 मध्ये...**

- देवाने इस्राएल लोकांना अदभुत रित्या मान्ना दिला तेव्हा मोशे त्यांचा नेता होता.
- येशू मोशेसारखा कसा आहे.

**पाहा योहान 6:48-51 मध्ये...**

- येशूने त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्यां सर्वांना कशाचे अभिवचन दिले.

**पाहा योहान 6:52-64 मध्ये...**

- येशूने त्याचे शरीर व रक्त ''खााणाऱ्या'' व ''पिणाऱ्या'' सर्वांना काय देण्याचे अभिवचन दिले आहे.
- लोक ख्रिस्ताला कसे ''खाणार'' व ''पिणार'' (पाहा वचने 63 व 64)

**पाहा मत्तय 26:26-29 मध्ये...**

- येशू आणि त्याचे शिष्य यहुदद्यांच्या वल्हांडणाचे भोजन करीत असताना काय घडले.
- येशूने वल्हांडणाच्या भाकरीला काय म्हटले.
- येशूने वल्हांडणाच्या प्याल्याला काय म्हटले.
- येशूने आपल्या शिष्यांना काय करण्याची आज्ञा दिली.

**पाहा 1 करिंय 10:16-22 मध्ये...**

- विश्वासणारे प्रभुभोजनाच्या प्याल्यातून पितात तेव्हा काय घडते (वचन 16)
- विश्वासणारे प्रभुभोजनाच्या भाकरीतून सेवन करतात तेव्हा काय घडते.
- मूर्तीपूजकांची अर्पणे खाणाऱ्या विश्वासणाऱ्यांना कोणता धोका आहे.

**पाहा 1 करिंथ 11:25-34 मध्ये...**

- प्रभुभोजन घेणे हे महत्वपूण संदेश सांगण्यासारखे कसे आहे (व. 26)
- प्रभुभोजन घेण्यापूर्वी विश्वासणाऱ्यांनी काय केले पाहिजे (व. 27 व 28)
- इतर विश्वासणाऱ्यांशी आपण प्रेमाने वागलो नाही तर कोणता धोका संभवतो.

## 2. आगामी आठवडयातील कार्यक्रमांविषयी सहकाऱ्यां बरोबर योजना आखा

नियमीत उपासनेला येवु न शकणाऱ्या आजारी व दुर्बल लोकांना डीकन्सनी प्रभुभोजन नेऊन देण्याची व्यवस्था करा.

कोणी विश्वासणारे प्रभुभोजनाचा मान ठेवत नाहीत असे दिसले तर त्यांच्याशी चर्चा करून प्रभुभोजन घेतांना ख्रिस्ताचे रहस्यमय शरीर व रक्त ह्या गोष्टींना आदर दाखवण्याची आवश्यकता असल्याचे सांगा.

प्रभुभोजनाचे वाटप करणाऱ्यांनी त्यावर येशू व पौला प्रमाणेच भर द्यावा याविषयी तुमच्या सहकाऱ्यांशी चर्चा करा.

प्रभुभोजनाचे वाटप करणाऱ्यांनी विश्वासणाऱ्यांना प्रभुभोजनात ख्रिस्ताच्या सान्निध्याचा अनुभव यावा याकरीता साहाय्य करावे, यावर तुमच्या सहकाऱ्यांशी चर्चा करा.

मंडळीतील सर्व पुढारी आणि कुटुंबप्रमुखांना प्रभुभोजन देण्याचे प्रशिक्षण द्या, त्याचे स्पष्टीकरण करा किंवा करू नका (पवित्र आत्मा विश्वासणाऱ्यांच्या अंत:करणांत कार्य करील तसे भाकरी  व प्याला स्वत:च त्यांच्याशी बोलेल)

## 3. आगामी उपासने विषायी तुमच्या सहकाऱ्यांबरोबर योजना आखा


मुलांना त्यांनी तयार केलेली नाटिका, कविता आणि प्रश्न विचारण्याची संधी द्या.

भाग 1 मध्ये तुम्हांला आढळलेल्या गोष्टी सांगा किंवा नाटयोकरण करा. तुम्हांला आढळलेल्या गाेष्टीं विषयी प्रश्न विचारा.

- यहुदी वल्हांडण सण,निर्गम 12:21-28

- स्वर्गातून आलेली भाकरी, निर्गम 16:2-5 व 30-31
- येशू चार हजारांना भोजन देतो, मार्क 8:1-9
- येशू लोकांना त्याचा देह खाण्यास सांगतो आणी त्याने विश्वासणाऱ्यांना कोणते अभिवचन दिले, योहान 6:25-36 व 48-64
- येशू प्रभुभोजनाच्या विधीची स्थापना करतो, मत्तय 26: 26-29
- प्रभुभोजनात खाणे व पिणे म्हणजे नेमके काय आहे, 1करिंथ 10:16-20
- प्रभुभोजन घेण्यापूर्वी आम्ही आमची पापे का कबूल करावीत, 1 करिंथ 11:25-34.

कोणी विश्वासणारे उत्तम गायक असतील आणि त्यांना येशूच्या वधस्तंभाविषयी एखादे गाणे येत असेल तर त्यांनी इतरांना ते शिकवावे मोठयाने गाणे गाणे धोक्याचे असेल तर हळू आवाजात गा.



प्रभुभोजनाची ओळख करून देण्यासाठी उत्पत्ती 4:4-14 वाचा हाबेलने किंवा त्यातून आदामाच्या मुलाने निर्दोष प्राणी घेऊन त्याचे होमार्पण देवाला केले हा वृत्तांत्त सांगा येशू हा निर्दोष आहे आणि त्याच्या अर्पणामुळेच आपण देवाकडे आलो हे स्पष्ट करा. भाकरी व प्याला घेण्यापूर्वी विश्वासणाऱ्यांना त्यांची पापे देवाजवळ किंवा त्यांनी सार्वजनिक पाप केले असेल तर मोठयाने गटाकडे कबूल करण्यास वेळ द्या.

**पाठ करा 1 योहान 1:7-9**

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net